:: प्रेस नोट ::

कार भाडयाने घेवून कारचालकास लुटण्याचा प्रयत्न करणा-या आरोपीस

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडून अटक

दिनांक 20/01/2020 रोजी रत्नागिरी ते साखरपा असे फोनद्वारे गाडीचे भाडे ठरवून दुपारी 12.30 चे सुमारास सिध्दाई हॉटेल पानवल या ठिकाणी गाडीत बसून (ओळख लपवण्यासाठी तोंडाला रुमाल बांधुन) सुरुवातीला साखरपा देवरुख व तेथून पुढे निवधेकडे जाणा-या निर्जन रोडने कार घेण्यास सांगून चालू कारमध्ये अचानक मागील बाजुने हाताने फिर्यादी यंाची कॉलर पकडून त्याला नायलॉन दोरीने बांधण्याचा प्रयत्न करुन दमदाटी करुन लुटण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी देवरुख पो.ठाणे गुरनं. 10/2020 भादविस कलम 393, 506 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

वर नमुद जबरी चोरी गुन्हयाच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.शिरीष सासने यांनी तात्काळ एक पथक तयार करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने सुचना व मार्गदर्शन केलेले होते त्याप्रमाणे सदर पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज प्राप्त करुन घेतले तसेच बातमीदारांकडून गोपनीय माहीती प्राप्त करुन तपास सुरु होता. सदर तपास पथकाने मिळालेल्या गोपनीय माहीतीच्या आधारे हातखंबा परिसरामधुन एक संशयीत इसम ताब्यात घेतला व त्याच्याकडे गुन्हयाच्या अनुषंगाने केलेल्या अधिक चौकशीमध्ये त्यांने गुन्हयाची कबुली दिली आहे. सदर आरोपीत इसम प्रदिप चंद्रकांत पाटील रा. वालुर ता. शाहुवाडी कोल्हापूर, सध्या रा. नवनाथ चाळ, महाराष्ट्र नगर, मानखुर्द (प.) मुंबई याने कर्जबाजारीपणामुळे सर्वप्रथम रत्नागिरी रेल्वेस्टेशन येथे एका महीलेची पर्स चोरली व त्यानंतर चोरलेल्या मोबाईलवरुन फोन करुन सदरची जबरी चोरी केल्याची कबुली दिलेली आहे. आरोपीकडून एकूण 7,430/- रुपये किमंतीचा मुद्देमाल हस्तगत करुन त्याला पुढील कार्यवाहीसाठी देवरुख पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ.श्री.प्रविण मुंढे, अपर पोलीस अधीक्षक श्री.विशाल गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.शिरीष सासने, पोउनि श्री.विकास चव्हाण, पोहेकॉ- संदिप कोळंबेकर, संजय कांबळे, राजु भुजबळराव, शांताराम झोरे, पोना- नितीन डोमणे, विजय आंबेकर, सागर साळवी, दत्ता कांबळे यांनी केलेली आहे.